Jagdamba Education Society's

Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

## * Central Library *

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 22/04/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

# दिनविशेष

## भाषातज्ज्ञ, साहित्य समीक्षक प्रा. अशोक केळकर



डॉ.अशोक रामचंद्र केळकर हे एक आंतरराष्ट्रीय कीर्तीचे भाषावैज्ञानिक, साहित्याचे जाणकार समीक्षक आणि संस्कृतीचे सखोल अभ्यासक होते. त्यांचा जन्म २२ एप्रिल १९२९ रोजी पुण्यात झाला. १९५३ मध्ये पुणे विद्यापीठातून इंग्रजी आणि फ्रेंच भाषेतून 'एम.ए.'ची पदवी त्यांनी घेतली. उच्चशिक्षणासाठी ते अमेरिकेला गेले. तेथील कॉर्नेल विद्यापीठातून त्यांनी भाषा, विज्ञान व मानववंशशास्त्र या विषयात डॉक्टरेट मिळवली. अमेरिकेतून आल्यानंतर डॉ. केळकर यांनी आग्रा विश्वविद्यालयात काही काळ सहाय्यक प्राध्यापक म्हणून काम केले. पुढे १९६२-६७ या काळात पुणे विद्यापीठात भाषा विज्ञानाचे प्रपाठक म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली.

अनेक देशांमधल्या जागतिक विद्यापीठांमध्ये व्याख्यानासाठी त्यांना निमंत्रणे येत असत. भारतीय भाषा संस्थान (मैसूर), मराठी अभ्यास परिषद (पुणे), राज्य मराठी विकास संस्था यांच्या स्थापनेमागे डॉ. केळकर आहेत. मराठी अभ्यास परिषदेचे संस्थापक-अध्यक्ष म्हणून त्यांनी अनेक वर्षे काम केले. परिषदेच्या 'भाषा आणि जीवन' या त्रैमासिकाचे पहिले संपादक डॉ. केळकर होते. त्यांच्या 'रुजवात' या पुस्तकाला २००८ मध्ये साहित्य अकादमी पुरस्काराने गौरविण्यात आले. आस्वाद मीमांसा, चिन्ह मीमांसा, सांस्कृतिक मानव विज्ञान यासारखे त्यांचे अनेक समीक्षात्मक ग्रंथ उल्लेखनीय मानले जातात. त्रिवेणी, कवितेचे अध्यापन, वैखरी, मध्यमा, मराठी भाषेचा आर्थिक संसार, भेदविलोपन एक आकलन, प्राचीन भारतीय साहित्य मीमांसा एक आकलन ही मराठीतील त्यांची पुस्तके विशेष गाजली. 'प्राचीन भारतीय साहित्य मीमांसा एक आकलन' या पुस्तकाच्या हिंदी अनुवादाला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. भाषाशास्त्रातील त्यांच्या कामगिरीबद्दल भारत सरकारने त्यांना साहित्य अकादमी, पद्मश्री पुरस्कार देऊन सन्मानित केले. अशोक केळकर यांचे २० सप्टेंबर, २०१४ रोजी निधन झाले.

Nashik Edition

Apr 22, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

Jagdamba Education Society's

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401